सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६**

# महाराष्ट्र (हैद्राबादच्या परिवेष्टित क्षेत्रातील) संकीर्ण दुमाला वहिवाटी रद्द करण्याबाबत अधिनियम, १९६५

**(दिनांक ६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)**

**MAHARASHTRA ACT No. LVI OF 1965**

# THE MAHARASHTRA MISCELLANEOUS ALIENATIONS (IN HYDERABAD ENCLAVES) ABOLITION ACT, 1965

*(As modified upto the 6th January 2016)*

[ व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ००४ यांनी प्रकाशित केले. ]

**२०१५**

[ किंमत : ]

# सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६

## महाराष्ट्र (हैद्राबादच्या परिवेष्टित क्षेत्रातील) संकीर्ण दुमाला वहिवाटी रद्द करण्याबाबत अधिनियम, १९६५.

## अनुक्रमणिका


उद्देशिका — पृष्ठे

कलमे

**प्रकरण १ - प्रारंभिक**

| | | |
|---|---|---|
| **१.** | लघु संज्ञा, व्याप्ती व प्रारंभ. | १ |
| **२.** | व्याख्या. | १ |
| **३.** | विवक्षित प्रकारच्या दुमाला वहिवाटींना अधिनियम लागू नसणे. | ३ |
| **४.** | विवक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार. | ४ |

**प्रकरण २ - दुमाला वहिवाटी रद्द करणे आणि भोगवट्याचे हक्क प्रदान करणे**

| | | |
|---|---|---|
| **५.** | दुमाला वहिवाटी व त्यांच्या संबंधातील हक्क व बोजे रद्द करणे. | ४ |
| **६.** | दुमाला जमिनींची जमीन महसूल देण्याबाबतची जबाबदारी. | ५ |
| **७.** | समाजसेवा इनामाच्या किंवा वतनाचा भाग असलेली जमीन परत देणे. | ५ |
| **८.** | कलम ७ किंवा ९ चे उपबंध लागू नसलेल्या दुमाला जमिनीच्या बाबतीत भोगवट्याचे हक्क प्रदान करणे. | ६ |
| **९.** | अनधिकृत धारकाच्या कब्जातील समाजसेवा, इनाम किंवा वतन म्हणून धारण केलेल्या जमिनीची विल्हेवाट लावणे. | ६ |
| **१०.** | सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ यास अधीन राहून जमीन परत देणे. | ६ |
| **११.** | इनाम जमिनीत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे सरकारकडे निहित होणे. | ६ |
| **१२.** | झाडांवरील हक्क. | ७ |

**प्रकरण ३ - नुकसानभरपाई व ती देणे**

| | | |
|---|---|---|
| **१३.** | जमीन महसुलाचे अभिहस्तांकन समाविष्ट असलेल्या दुमाला वहिवाटीच्या बाबतीत नुकसानभरपाई. | ७ |
| **१४.** | सेवा बजावण्याचा हक्क रद्द केल्याबद्दल वतनदारास नुकसानभरपाई देणे. | ८ |
| **१५.** | कलम ११ मध्ये उल्लेख केलेल्या मालमत्तेतील हक्क नष्ट केल्याबद्दल दुमालदारांना नुकसानभरपाई देणे. | ८ |

| | | |
|---|---|---|
| **१६.** | दुमालदारास नुकसानभरपाई देण्याची पध्दत. | ८ |
| **१७.** | मालमत्तेवरील इतर इसमांचे हक्क रद्द, वगैरे केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची पध्दत. | ९ |
| **१८.** | विवक्षित बाबतीत भूमि संपादन अधिनियमाचे उपबंध निवाड्याच्या नमुन्यास लागू असणे व आवश्यक असलेली पूर्वसंमती घेणे. | ९ |
| **१९.** | जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुध्द अपील. | ९ |
| **२०.** | महसूल न्यायाधिकरणापुढील कार्यपद्धती. | ९ |
| **२१.** | मुदत. | १० |
| **२२.** | न्यायालय शुल्क. | १० |
| **२३.** | निवाडा व महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असणे. | १० |
| **२४.** | चौकशी व कामकाज हे न्यायालयीन कामकाज असणे. | १० |
| **२५.** | भरपाई रोख देणे. | १० |
| **२६.** | जमीन महसूल वगैरेच्या थकबाकीची रक्कम नुकसानभरपाईच्या रकमेतून वजा करणे. | १० |

**प्रकरण ४ - संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| **२७.** | दुमाला जमिनीच्या पट्ट्यांना सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ लागू असणे. | १० |
| **२८.** | वारसाहक्कासंबंधीचा विशेष नियम निरर्थक होणे. | ११ |
| **२९.** | अधिकार सोपवणे. | ११ |
| **३०.** | नियम. | ११ |
| **३१.** | बचाव. | १२ |

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६[१].

## महाराष्ट्र (हैद्राबादच्या परिवेष्टित क्षेत्रातील) संकीर्ण वहिवाटी रद्द करण्याबाबत अधिनियम, १९६५.

[ या अधिनियमास दिनांक १८ डिसेंबर १९६५ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली; ही अनुमती **"महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-चार, असाधारण,"** दिनांक २४ डिसेंबर १९६५ रोजी प्रथम प्रसिद्ध झाली. ]

[ २४ डिसेंबर १९६५ ]

### सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३ द्वारे सुधारणा केलेला

**भारत आणि हैदराबाद (परिवेष्टित क्षेत्रांची अदलाबदल) आदेश, १९५० अन्वये पूर्वीच्या मुंबई प्रांतात समाविष्ट केलेल्या पूर्वीच्या हैदराबाद राज्याच्या परिवेष्टित क्षेत्रात प्रचलित असलेल्या विवक्षित दुमाला वहिवाटी रद्द करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** भारत आणि हैद्राबाद (परिवेष्टित क्षेत्रांची अदलाबदल) आदेश, १९५० अन्वये पूर्वीच्या मुंबई प्रांतात समाविष्ट केलेल्या पूर्वीच्या हैद्राबाद राज्याच्या आणि आता महाराष्ट्र राज्याचा भाग असलेल्या परिवेष्टित क्षेत्रांमध्ये प्रचलित असलेल्या विवक्षित दुमाला वहिवाटी रद्द करण्यात आल्या आहेत;

**आणि ज्याअर्थी,** सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उक्त परिवेष्टित क्षेत्रांमध्ये प्रचलित असलेल्या उर्वरित दुमाला वहिवाटी रद्द करणे आणि त्यास परिणामभूत व आनुषंगिक असलेल्या गोष्टींची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

### प्रकरण १

### प्रारंभिक

**१.** (१) ह्या अधिनियमास, महाराष्ट्र (हैद्राबादच्या परिवेष्टित क्षेत्रातील) संकीर्ण दुमाला वहिवाट रद्द करण्याबाबत अधिनियम, १९६५ असे म्हणावे. लघु संज्ञा, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, भारत आणि हैद्राबाद (परिवेष्टित क्षेत्रांची अदलाबदल) आदेश, १९५० अन्वये पूर्वीच्या मुंबई प्रांतात समाविष्ट केलेल्या पूर्वीच्या हैद्राबाद राज्याच्या आणि आता महाराष्ट्र राज्याचा भाग असलेल्या परिवेष्टित क्षेत्रांना लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ह्याबाबतीत जी तारीख नेमील त्या तारखेस* अंमलात येईल.

**२.** (१) संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,--- व्याख्या.

(अ) "दुमाला वहिवाट" या संज्ञेचा अर्थ, त्या त्या वेळच्या सत्ताधारी प्राधिकाऱ्याने---

(एक) गावाचे, गावाच्या भागाचे किंवा जमिनीचे कोणत्याही इसमास दिलेले अनुदान किंवा अनुदान म्हणून दिलेली मान्यता, मग असे अनुदान जमीनमहसूल देणाच्या माफीसह किंवा माफी-वाचून दिलेल्या जमिनीच्या स्वरुपातील असो किंवा तिचा संपूर्ण जमीनमहसूल किंवा जमीनमहसूलाचा हिस्सा अभिहस्तांकनाच्या स्वरूपातील असो;

* शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, जेएचआर-१०६२-चार-पन्नास, दिनांक १९ मार्च, १९६६ याद्वारे १ एप्रिल, १९६६ (महाराष्ट्र शासन, राजपत्र, भाग-ब, इं., पृष्ठ ३६३).

(दोन) कोणत्याही इसमास, त्याने धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या संबंधात, जमीनमहसूल देण्याच्या संपूर्ण किंवा अंशत: माफीचे दिलेले अनुदान किंवा अनुदान म्हणून मान्यता ; किंवा

(तीन) कोणत्याही नावाने ओळखले जाणारे कोणत्याही इसमास दिलेल्या नक्त नेमणुकीचे अनुदान किंवा अनुदान म्हणून मान्यता ;

असा समजावा आणि तीत पुढील गोष्टींचा समावेश होतो :---

(एक) हैद्राबाद (जहागिरी रद्द करणे) विनियम, १३५८ फसली, अन्वये जहागीरदारास किंवा हिस्सेदारास द्यावयाची रक्कम मिळण्याचा हक्क, [असा हक्क हा भारत आणि हैद्राबाद (परिवेष्टित क्षेत्रांची अदलाबदल) आदेश, १९५० अन्वये चालू ठेवण्यात आलेला हक्क असेल] ; १३५८ फ चा हैद्राबाद क्र. ६९.

(दोन) वंशपरंपरेने धारण केलेले कोणत्याही गावाच्या पटवाऱ्याचे पद धारण करण्याचा हक्क आणि त्या पदाशी संबंधित असलेली सेवा करण्याची जबाबदारी ;

(ब) " दुमाला जमीन " या संज्ञेचा अर्थ, दुमालदाराने दुमाला वहिवाटीअन्वये धारण केलेली जमीन, असा समजावा ;

(क) " दुमालदार " या संज्ञेचा अर्थ, दुमाला वहिवाट धारण करणारा इसम, असा समजावा आणि तीत अशा दुमाला वहिवाटीच्या प्रयोजनासाठी त्याचा सह-हिस्सेदार म्हणून मान्यता दिलेल्या इसमाचा समावेश होतो ;

(ड) " नेमलेला दिवस " या संज्ञेचा अर्थ, ज्या तारखेस हा अधिनियम अंमलात येईल ती तारीख, असा समजावा ;

(इ) " आकारणी " या संज्ञेचा अर्थ, जमीन महसूल अधिनियमान्वये आणि तद्न्वये केलेल्या नियमानुसार जमिनीवर बसविलेली किंवा बसविण्याजोगी संपूर्ण आकारणी, असा समजावा ;

(फ) " अधिकृत धारक " या संज्ञेचा अर्थ, दुमालदाराने किंवा वतनदाराने (कोणत्याही समाजसेवा इनमाचा किंवा वतनाचा भाग असणाऱ्या) ज्या कोणत्याही जमिनीचे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधांनुसार आणि असे इनाम किंवा वतन यांचे नियमन करणाऱ्या कोणत्याही विशेष अटी व शर्ती असल्यास त्यानुसार विक्री करून, देणगी देऊन किंवा अन्य रीतीने वैधरीत्या कायमचे अन्यसंक्रामण केले असेल त्या जमिनीची मालकी ज्याच्याकडे निहित असेल असा इसम, असा समजावा ;

(ग) " जमीन महसूल अधिनियम " या संज्ञेचा अर्थ, **मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ असा समजावा ; १८७९ चा मुंबई ५.

(ह) " जिल्हाधिकारी " या संज्ञेत, ह्या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार चालविण्यासाठी आणि त्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य सरकारने विशेषरीत्या नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(आय) " समाजसेवा इनाम " या संज्ञेचा अर्थ, ग्रामीण जनतेस उपयुक्त अशी सेवा करण्याच्या प्रयोजनांसाठी धारण केलेली दुमाला वहिवाट, असा समजावा, आणि तीत अशा सेवेची गरज राहिली नसली तरीही, अशा सेवेसाठी धारण केलेल्या दुमाला वहिवाटीचा समावेश होतो ;

---

** आता पहा, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (१९६६ चा ४१).

(ज) " परिवेष्टित क्षेत्र " या संज्ञेचा अर्थ, भारत आणि हैद्राबाद (परिवेष्टित क्षेत्रांची अदलाबदल) आदेश, १९५० अन्वये त्यावेळच्या मुंबई प्रांतात समाविष्ट केलेली व त्यांचा भाग बनलेली, यास जोडलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेली हैद्राबादची परिवेष्टित क्षेत्रे, असा समजावा ;

(के) " विहित " म्हणजे ह्या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित ;

(ल) " अनधिकृत धारक " या संज्ञेचा अर्थ, कोणताही हक्क नसताना (समाजसेवा इनामाचा किंवा वतनाचा भाग असणारी) जमीन कब्जात असलेला, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये किंवा असे इनाम किंवा वतन याचे नियमन करणाऱ्या कोणत्याही अटी व शर्ती असल्यास त्याअन्वये रद्द व निरर्थक असलेला कोणताही पट्टा, गहाण, विक्रीखत, बक्षीसपत्र किंवा इतर कोणत्याही प्रकारची दुमाला वहिवाट याअन्वये जमीन कबजात असलेला इसम, असा समजावा ;

(म) " वतन " या संज्ञेचा अर्थ (सामान्यत: पटवारी या नावाने ओळखण्यात येणाऱ्या) ग्राम लेखापालाच्या पदाशी किंवा (सामान्यत: सरदेशमुख, देशमुख, देशपांडे आणि देसाई या नावाने किंवा तशा प्रकारच्या इतर कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या) जिल्हा (परगणा) अधिकाऱ्याच्या पदाशी संबद्ध असलेले वतन म्हणून धारण केलेली दुमाला वहिवाट, असा समजावा ; असे पद हे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधांन्वये कोणतीही वतन मालमत्ता असल्यास अशा वतन मालमत्तेचा सत्ताप्रकार आणि त्यास संलग्न असलेले हक्क, विशेष अधिकार व जबाबदाऱ्या यासह कोणत्याही गावच्या प्रशासनाशी किंवा गावचा सार्वजनिक महसूल गोळा करण्याशी किंवा ग्राम पोलिसांशी किंवा सीमा ठरविण्याशी किंवा नागरी प्रशासनासंबंधीच्या इतर बाबींशी संबंधित असलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी वंशपरंपरेने धारण करण्यात येत असेल ; आणि त्यात ज्याच्या बाबतीत मोबदल्याची तडजोड करण्यात आली असेल अशा उक्त पदांसंबंधीच्या वतनाचा समावेश होतो ;

(न) " वतनदार " या संज्ञेचा अर्थ, वतनामध्ये वंशपरंपरागत हितसंबंध असलेला इसम, असा समजावा ;

१३५८ फ चा हैद्राबाद क्र. ६९.

(२) " हिस्सेदार " व " जहागिरदार " या शब्दप्रयोगाचा अर्थ, हैद्राबाद (जहागीरदारी रद्द करणे) विनियम, १३५८ फसली याअन्वये त्यांना अनुक्रमे जी अर्थ दिला असेल तोच असेल.

(३) ह्या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले इतर शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, जमीन महसूल अधिनियमात त्यांना जो अर्थ दिला असेल तोच असेल.

(४) कोणत्याही दुमाला वहिवाटीस अनुषंगिक असलेल्या गोष्टींसंबंधी ह्या अधिनियमात असलेले उल्लेख हे, अशी दुमाला वहिवाट रद्द करण्यात आली असली तरीही, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या अनुषंगिक गोष्टींसंबंधीचे उल्लेख आहेत असे समजले पाहिजे.

विवक्षित प्रकारच्या दुमाला वहिवाटींना अधिनियम लागू नसणे.

**३.** ह्या अधिनियमातील कोणताही मजकूर देवस्थान, दुमाला वहिवाटींना किंवा कोणत्याही धर्मादाय किंवा धार्मिक संस्थांनी धारण केलेल्या दुमाला वहिवाटींना लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण**.–ह्या कलमाच्या प्रयोजनांसाठी, धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेने धारण केलेली दुमाला वहिवाट म्हणजे, त्यावेळच्या सत्ताधारी प्राधिकाऱ्याने धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठी दिलेली किंवा देणगी म्हणून मान्यता दिलेली आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये ठेवलेल्या संबंधित महसुली अभिलेख्यांमध्ये तशी दुमाला वहिवाट म्हणून दाखल केलेली दुमाला वहिवाट.

विवक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार.

**४.** (१) (एक) कोणतीही जमीन ही दुमाला वहिवाट आहे किंवा काय ;

(दोन) कोणतेही दुमाला वहिवाट ही जमिनीचे अनुदान आहे किंवा जमीन महसुलाच्या अभिहस्तांकनाच्या स्वरूपातील अनुदान आहे किंवा दोन्ही स्वरूपातील अनुदान आहे किंवा जमीन महसूल देण्याच्या संपूर्ण किंवा अंशत: माफीच्या स्वरूपातील अनुदान आहे किंवा काय ;

(तीन) कोणतेही दुमाला वहिवाट ही वतन, समाजसेवा, इनाम किंवा इतर कोणत्याही प्रकारचे इनाम आहे किंवा काय ;

(चार) दुमाला वहिवाटीअन्वये धारण केलेली कोणतीही जमीन ही सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय दुसऱ्याच्या नावे करून देता येण्यासारखी आहे किंवा नाही ;

(पाच) कोणतीही वतन जमीन स्थानापन्नाच्या परिश्रमिकासाठी नेमून दिली आहे किंवा काय ;

(सहा) एखादा इसम हा वतनदार आहे, किंवा समाजसेवा इनामाचा इनामदार, जहागीरदार किंवा हिस्सेदार आहे किंवा काय ;

(सात) समाजसेवा इनाम किंवा वतन धारण करणारा कोणताही इसम हा अधिकृत धारक किंवा अनधिकृत धारक आहे किंवा काय ;

यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, जिल्हाधिकाऱ्याने, हितसंबंधास बाध येणाऱ्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर व चौकशी केल्यानंतर अशा प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे.

(२) अशा निर्णयामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास अशा निर्णयाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत राज्य सरकारकडे अपील दाखल करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये करावयाच्या अपिलास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय व त्या पोट-कलमान्वये केलेल्या अपिलात राज्य सरकारने दिलेला निर्णय अंतिम असेल.

## प्रकरण २

## दुमाला वहिवाटी रद्द करणे आणि भोगवट्याचे हक्क प्रदान करणे.

दुमाला वहिवाटी व त्यांच्या संबंधातील हक्क व बोजे रद्द करणे.

**५.** कोणत्याही परिवेष्टित क्षेत्रातील कोणत्याही दुमाला वहिवाटीस त्या त्या वेळी लागू असलेला कोणताही रिवाज, तडजोड, अनुदान, कबुलायत, सनद, मंतखब किंवा इतर कोणताही विलेख, आदेश, नियम, अधिसूचना किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश किंवा कोणताही विधी यात काहीही असले तरी, नेमलेल्या दिवसापासून —

(अ) सर्व दुमाला वहिवाटी रद्द करण्यात आल्या आहेत असे समजले पाहिजे ;

(ब) ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा तद्नुसार स्पष्टपणे जी तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करून, अशा दुमाला वहिवाटीच्या संबंधात, उक्त तारखेस, वैघरीत्या अस्तित्वात असलेले सर्व हक्क आणि अशा दुमाला वहिवाटीशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी (पद धारण करण्याचा कोणताही हक्क किंवा अशा कोणत्याही दुमाला वहिवाटीशी संबंधित असलेली सेवा बजावण्यासंबंधातील कोणतीही जबाबदारी धरून) नष्ट होतील आणि त्या याद्वारे, नष्ट करण्यात आल्या आहेत ;

(क) ह्या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, समाजसेवा इनामे व वेतने या स्वरूपातील दुमाला जमिनी, याद्वारे परत घेण्यात येत आहेत.

दुमाला जमिनींची जमीन महसूल देण्याबाबतची जबाबदारी.

**६.** ह्या अधिनियमाच्या इतर उपबंधास अधीन राहून, सर्व दुमाला जमिनी, उक्त जमीन महसूल अधिनियमाचे उपबंध व त्याअन्वये केलेल नियम यास अनुसरून जमीन महसूल देण्यात पात्र ठरतील व याद्वारे पात्र ठरविण्यात आल्या आहेत आणि त्यानुसार बिनदुमाला जमिनीसंबंधीचे उक्त अधिनियमाचे उपबंध हे अशा सर्व जमिनींना लागू असतील.

समाजसेवा इनामाचा किंवा वतनाचा भाग असलेली जमीन परत देणे.

**७.** (१) कलम १० च्या उपबंधास अधीन राहून, कलम ५ अन्वये परत घेण्यात आलेले समाजसेवा इनाम म्हणून किंवा वतन म्हणून धारण केलेली जमीन ही, ती परत देण्यासाठी अर्ज केला असता—

(अ) जर अशी जमीन कोणत्याही दुमालदाराच्या कब्जात असेल किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्याकडून धारण करणाऱ्या (अधिकृत किंवा अनधिकृत धारक नसेल अशा) इसमाच्या कब्जात असेल तर अशा दुमालदारास ; आणि

(ब) जर अशी जमीन, अधिकृत धारकाच्या कब्जात असेल तर, अशा अधिकृत धारकास, अशा जमिनीच्या पूर्ण आकारणीच्या रकमेच्या सहापटी इतके भोगाधिकार मूल्य, विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या रीतीने, राज्य सरकारला दिल्यानंतर, परत देण्यात येईल; आणि त्यानंतर, दुमालदार किंवा अधिकृत धारक हा, जमीन महसूल अधिनियमाच्या अर्थानुसार अशा जमिनीच्या बाबतीत भोगवटा करणारा इसम असेल, आणि तो जमीन महसूल अधिनियमाच्या व त्याअन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधास अनुसरून, राज्य सरकारास, जमीन महसूल देण्याबद्दल प्रथमत: जबाबदार असेल; आणि बिनदुमाला जमिनीसंबंधातील जमीन महसूल अधिनियमाचे व नियमांचे सर्व उपबंध हे, ह्या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, उक्त जमिनीस लागू असतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या रीतीने, भोगाधिकार मूल्य देण्यात कसूर होईल तर, दुमालदार किंवा यथास्थिति, अधिकृत धारक हा, अनधिकृपणे जमीन धारण करीत असल्याचे समजण्यात येईल आणि तो, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधास अनुसरून, जिल्हाधिकाऱ्याकडून संक्षिप्तरित्या चौकशी करून त्या जमिनीतून काढून टाकला जाण्यास पात्र होईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये परत देण्यात आलेल्या जमिनीबाबतचा भोगाधिकार हा, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय व उक्त जमीन शेतीच्या प्रयोजनासाठी धारण करण्यात व वापरण्यात येत असेल त्या बाबतीत, त्या जमिनीच्या पूर्ण आकारणीच्या रकमेच्या वीसपटीइतकी रक्कम व इतर कोणत्याही बाबतीत जमिनीच्या बाजार किंमतीच्या पन्नास टक्क्यांइतकी रक्कम देण्यात आल्याशिवाय, हस्तांतरीत करता येणार नाही किंवा त्याची मोजूनमापून विभागणी करता येणार नाही :

परंतु, शेतीच्या प्रयोजनार्थ धारण केलेल्या व उपयोगात आणलेल्या कोणत्याही जमिनीचा भोगाधिकार हस्तांतर करण्याजोगा किंवा मोजूनमापून विभागण्याजोगा करण्यात आला असेल आणि त्यानंतर अशा जमिनीचा शेतीव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करण्यात आला असेल तर तिचा धारक हा, जमिनीच्या त्यावेळच्या बाजार किंमतीच्या पन्नास टक्क्यांइतकी रक्कम व आधीच दिलेली रक्कम यातील फरकाइतकी रक्कम जिल्हाधिकाऱ्यास देण्यास जबाबदार असेल.

कलम ७ किंवा ९ चे उपबंध लागू नसलेल्या दुमाला जमिनीच्या बाबतीत भोगवट्याचे हक्क प्रदान करणे.

**८.** कलम ७ किंवा ९ चे उपबंध लागू नसलेला दुमाला जमिनीच्या बाबतीत दुमालदार, जमीन महसूल अधिनियमाच्या व त्याअन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधास अनुसरून, त्याच्या प्रत्यक्ष कब्जात असलेल्या, किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्याकडून धारण करणाऱ्या कोणत्याही इसमाच्या कब्जात असलेल्या, जमिनीच्या संबंधात, देय असलेला जमीन महसूल, राज्य सरकारला देण्यास प्रथमत: जबाबदार असेल, आणि त्यास जमीन महसूल अधिनियम किंवा त्याअन्वये केलेले नियम याअन्वये खातेदार म्हणून अशा जमिनी संबंधाने सर्व हक्क असतील आणि तो अशा जमिनी संबंधाने असलेल्या सर्व जबाबदाऱ्यास पात्र असेल.

अनधिकृत धारकाच्या कब्जातील समाजसेवा इनाम किंवा वतन म्हणून धारण केलेल्या जमिनीची विल्हेवाट लावणे.

**९.** (१) कलम ५ अन्वये परत घेण्यात आलेली समाजसेवा इनाम म्हणून किंवा वतन म्हणून धारण केलेली कोणतीही जमीन अनधिकृत धारकाच्या कब्जात असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधानुसार संक्षिप्तरित्या काम चालवून, अशा धारकास काढून टाकता येईल.

परंतु, जेव्हा कोणत्याही अनधिकृत धारकाच्या बाबतीत जमिनीच्या विकासासाठी किंवा जमिनीचा अकृषिक कारणासाठी केलेल्या उपयोगासाठी गुंतविलेली रक्कम किंवा इतर गोष्टी लक्षात घेता अशा धारकास त्या जमिनीतून काढून लावल्यामुळे त्यास निष्कारण हालअपेष्टा सहन कराव्या लागतील, असे राज्य सरकारचे मत होईल तर, त्यास, ती जमीन, राज्य सरकार ठरवील अशी रक्कम दिल्यानंतर व अशा शर्तीस व अटीस अधीन राहून, अशा धारकास, परत देण्याविषयी, जिल्हाधिकाऱ्यास निदेश देता येईल आणि जिल्हाधिकाऱ्याने तद्नुसार ती जमीन अशा धारकास परत दिली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली जमीन, त्या कलमान्वये परत देण्यात आली नसेल तर अशा जमिनीची विल्हेवाट, भोगवट्यात नसलेल्या बिनदुमाला जमिनीची विल्हेवाट लावण्याच्या बाबतीत लागू असलेल्या जमीन महसूल अधिनियमाच्या व त्याअन्वये केलेल्या नियमाच्या उपबंधास अनुसरून, लावण्यात आली पाहिजे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ यास अधीन राहून जमीन परत देणे.

**१०.** कलम ७ किंवा ९ याच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधान्वये कोणतीही जमीन कोणत्याही इसमास परत देण्यात आली असेल त्या बाबतीत अशी जमीन महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ याच्या उपबंधास अधीन राहून, अशा रीतीने, परत देण्यात आली पाहिजे की, जेणेकरून अशा रीतीने जमीन परत दिल्यामुळे त्याने धारणा केलेली जमीन, अशी जमीन परत देण्यात आल्यानंतर, त्या अधिनियमान्वये त्यास ज्या कमाल क्षेत्राइतकी जमीन धारण करण्याची परवानगी असेल त्याहून अधिक होणार नाही; आणि तद्नुसार जी जमीन किंवा तिचा जो भाग परत देता येत नाही अशी कोणतीही जमीन किंवा तिचा भाग याची विल्हेवाट, भोगवट्यात नसलेल्या, बिनदुमाला जमिनीची विल्हेवाट लावण्याच्या बाबतीत लागू असलेल्या जमीन महसूल अधिनियमाच्या व नियमाच्या उपबंधानुसार, लावण्यात आली पाहिजे, आणि अशी जमीन ज्याच्या कब्जात असेल असा कोणताही इसम, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधानुसार, जिल्हाधिकाऱ्याकडून संक्षिप्तरीत्या काम चालवून त्या जमिनीतून काढून टाकला जाण्यास पात्र असेल.

१९६१ चा महाराष्ट्र २७.

इनाम जमिनीत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे सरकारकडे निहित होणे.

**११.** कोणत्याही दुमाला गावाच्या किंवा दुमाला जमिनीच्या हद्दीत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या व वाटा, त्यावरील किंवा त्यांच्याजवळील सर्व पूल, चर, धरणे व कुंपणे, नद्या, ओढे, नाले, सरोवरे, विहिरी व तळी यांची पात्रे व सर्व कालवे व पाण्याचे प्रवाह व सर्व साचलेले व वाहते पाणी व ज्यावर घरे बांधलेली नाहीत अशा सर्व गावठाण जमिनी, पडीत व लागवडीखाली नसलेल्या (घरे बांधण्याच्या व इतर अकृषिक प्रयोजनासाठी उपयोगात आणलेल्या जमिनी सोडून) सर्व जमिनी व सर्व

कुरणे, खनिज पदार्थ—मग ते शोधून काढलेले असोत किंवा नसोत—आणि खाणी—मग तीत काम चालू असो वा नसो आणि दगडाच्या सर्व खाणी ही सर्व त्यात किंवा त्यावर दुमालदाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही इसमाचे कोणतेही हक्क प्रस्थापित करण्यात येतील ते खेरीजकरून, व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर विधिअन्वये अन्यथा जी कोणतीही तरतूद केली असेल ती खेरीज करून राज्य सरकारकडे निहित होतील व त्यात किंवा त्यावर असलेल्या किंवा त्यासंबंधात असलेल्या सर्व हक्कांसह, ती राज्य सरकारची मालमत्ता आहे असे समजण्यात येईल व अशा मालमत्तेच्या संबंधात दुमालदारास असलेले सर्व हक्क नष्ट करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्याने राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, लोकांचे किंवा व्यक्तीचे वैधरित्या अस्तित्वात असलेले जाण्या-येण्याचे हक्क व इतर हक्क या नेहमी अधीन राहून, त्याची विल्हेवाट लावणे हे विधिसंमत असेल.

**स्पष्टीकरण**.–या कलमाच्या प्रयोजनाकरिता, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी लागोपाठ तीन वर्षांच्या मुदतीत जर जमीन कसण्यास आली नसेल तर ती लागवडीस न आणलेली जमीन आहे असे समजण्यात येईल.

**१२.** कोणताही करार, अनुदान किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला निधी या अन्वये राज्य सरकारने ज्यांचा मालकी हक्क हस्तांतरित केला असेल त्या झाडाव्यतिरिक्त भारतीय वन अधिनियम, १९२७ किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधी याअन्वये खास राखून ठेवण्यात आलेल्या झाडांवरील हक्क राज्य सरकारकडे निहित होतील ; आणि ह्या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेला भारतीय वन अधिनियम, १९२७ याचे उपबंध, दुमाला जमिनीतील वनांना लागू करण्याच्या राज्य सरकारच्या हक्कास कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही.

झाडांवरील हक्क.

१९२७ चा १६.

१९२७ चा १६.

## प्रकरण ३

## नुकसानभरपाई व ती देणे

**१३.** (१) ज्या दुमाला वहिवाटीत—(अ) कोणत्याही गावाच्या, त्याच्या भागाच्या किंवा जमिनीच्या संपूर्ण जमीन महसुलाचे किंवा त्याच्या हिश्श्याचे अभिहस्तांकन, किंवा

(ब) कोणत्याही नावाने संबोधिली जाणारी नक्त नेमणूक किंवा

(क) हैद्राबाद (जहागिरी रद्द करणे) विनियम, १३५८ फसली आणि भारत आणि हैद्राबाद (परिवेष्टित क्षेत्रांची अदलाबदल) आदेश, १९५० अन्वये देय असलेली रक्कम मिळण्याचा हक्क.

जमीन महसुलाचे अभिहस्तांकन समाविष्ट असलेल्या दुमाला वहिवाटीच्या बाबतीत नुकसान भरपाई.

१३५८ फ चा हैद्राबाद क्र. ६९.

समाविष्ट असेल अशा दुमाला वहिवाटीच्या बाबतीत, अशा जमीन महसुलाच्या किंवा नक्त नेमणुकीच्या किंवा यथास्थिति उपरोक्तप्रमाणे देय असलेल्या रकमेच्या सातपट रकमेइतकी रक्कम दुमाला वहिवाट रद्द केल्याबद्दलची नुकसानभरपाई म्हणून दुमालदारास दिली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनाकरिता, जमीन महसुलाची किंवा नक्त नेमणुकीची किंवा उपरोक्तप्रमाणे दिलेली किंवा देय असलेली रक्कम ही नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या वर्षाबद्दल जमीन महसूल किंवा नक्त नेमणूक किंवा उपरोक्तप्रमाणे दिलेली किंवा देय असलेली रक्कम यांच्या अनुदानाबद्दल दुमालदारास मिळालेली किंवा त्यास देणे असलेली रक्कम असेल.

सेवा बजावण्याचा हक्क रद्द केल्याबद्दल वतनदारास नुकसानभरपाई देणे.

**१४.** ह्या अधिनियमाच्या उपबंधांचा परिणाम म्हणून, ज्यास वंशपरंपरागत पदाची कर्तव्ये बजावण्याचा हक्क असण्याचे बंद झाले असेल अशा वतनदारास, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या वर्षी त्यास एकूण वार्षिक उपलब्धीची जी रक्कम देण्यात आली होती किंवा त्यास देय होती त्या एकूण रकमेच्या सातपटीइतकी रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळण्याचा हक्क असेल ;

परंतु, जेव्हा अशा उपलब्धीत स्थानापन्नाच्या पारिश्रमिकासाठी नेमून देण्यात आलेल्या वतन जमिनीचा संपूर्ण नफा किंवा त्याचा भाग समाविष्ट असेल तेव्हा वतनदारास द्यावयाची नुकसान भरपाई ठरविण्याकरिता, अशारितीने नेमून दिलेल्या वतन जमिनीतील नफा हा, जमीन महसूल अधिनियम व तद्न्वये केलेले नियम यांच्या उपबंधांस अनुसरून त्या जमिनीवर आकारण्याजोग्या किंवा आकारण्यात आलेल्या संपूर्ण जमीन महसुलाच्या रकमेइतका असल्याचे समजण्यात आले पाहिजे.

कलम ११ मध्ये उल्लेख केलेल्या मालमत्तेतील हक्क नष्ट केल्याबद्दल दुमालदारांना नुकसानभरपाई देणे.

**१५.** कलम ११ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही मालमत्तेत कोणताही हक्क किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही दुमालदारास, जर तो, असा कोणताही हक्क किंवा हितसंबंध त्यात होता अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल अशारीतीने सिद्ध करून दाखवील तर, पुढील रीतीने नुकसानभरपाई मिळवण्याचा हक्क असेल :—

(अ) जर संबंधित मालमत्ता पडीत किंवा लागवडीखाली न आणलेली परंतु लागवडीखाली आणण्यास योग्य अशी जमीन किंवा कुरण असेल तर नुकसानभरपाईची रक्कम, जमिनीच्या आकारणीच्या तीनपटीहून अधिक असता कामा नये ;

(ब) जर प्रस्तुत मालमत्ता ही, जिच्यावर लोक जाण्या-येण्याचा हक्क उपभोगीत आहेत किंवा त्यांनी असा हक्क संपादन केला आहे किंवा तिच्यावर कोणत्याही व्यक्तीचा कोणताही वहिवाटीचा हक्क आहे अशी जमीन असेलतर, नुकसानभरपाईची रक्कम, जमिनीच्या वार्षिक आकारणीच्या रकमेहून अधिक असता कामा नये.

(क) जर त्या जमिनीवर कोणतीही झाडे किंवा इमले असतील तर, नुकसानभरपाईची रक्कम, यथास्थिति, अशी झाडे किंवा इमले यांच्या बाजार किंमती इतकी असेल.

(इ) खनिज पदार्थांच्या बाबतीत, नुकसान भरपाईची रक्कम ही नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षांमध्ये दुमालदारास खनिज पदार्थांच्याबाबतीत मिळालेल्या वार्षिक उत्पन्नाच्या सरासरी रकमेइतकी असेल.

**स्पष्टीकरण** .– ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता, " बाजार किंमत " या संज्ञेचा अर्थ, भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम २३ व कलम २४ चे उपबंध जेथवर लागू करता येतील तेथवर, उक्त उपबंधास अनुसरून अंदाज करून काढलेली किंमत, असा समजावा. १८९४ चा १.

दुमालदारास नुकसानभरपाई देण्याची पध्दत.

**१६.** (१) कलम १३, १४ किंवा १५ अन्वये नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही दुमालदाराने उक्त कलमान्वये त्यास मिळण्याजोग्या नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याबाबत विहित केलेल्या मुदतीत जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज मिळाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने, रीतसर चौकशी करण्यासाठी जमीन महसूल अधिनियमात निर्धारित केलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर अर्जदारास द्यावयाच्या नुकसान-

भरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा दिला पाहिजे. नुकसानभरपाईचा दावा सांगणारे कोणतेही सहहिस्सेदार असतील त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने आपल्या निवाड्याद्वारे नुकसानभरपाईची रक्कम सहहिस्सेदारांमध्ये विभागून दिली पाहिजे.

**१७.** (१) मालमत्तेवरील कोणतेही हक्क किंवा हितसंबंध रद्द करणाऱ्या, नष्ट करणाऱ्या किंवा त्यात फेरफार करणाऱ्या या अधिनियमाच्या उपबंधांमुळे ज्या कोणत्याही इसमाचे नुकसान झाले असेल, आणि अशा रद्द करण्याबद्दल, नष्ट करण्याबद्दल किंवा त्यात फेरफार करण्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची या अधिनियमाच्या उपबंधात तरतूद करण्यात आली नसेल तर, अशा इसमास नुकसानभरपाई मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करता येईल. मालमत्तेवरील इतर इसमांचे हक्क रद्द वगैरे केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची पध्दत.

(२) पोट-कलम (१) अन्वये करावयाचा अर्ज विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकाऱ्याकडे केला पाहिजे. जिल्हाधिकाऱ्याने रीतसर चौकशी करण्यासाठी जमीन महसूल अधिनियमात
१८९४ चा १. निर्धारित केलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर भूमि संपादन अधिनियम, १८९४, याच्या कलम २३ चे पोट-कलम (१) व कलम २४ यात तरतूद केलेल्या रीतीने व पद्धतीनुसार नुकसानभरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा दिला पाहिजे.

(३) ह्या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही इसमास जमीन महसूल भरण्याची संपूर्ण किंवा अंशत: माफी असलेली कोणतीही दुमाला जमीन, ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधानुसार संपूर्ण आकारणी देण्यास पात्र ठरविण्यात आली आहे या कारणावरून त्यास नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

**१८.** (१) कलम १६ किंवा १७ अन्वये दिलेला प्रत्येक निवाडा भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम २६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे आणि त्या अधिनियमाचे उपबंध शक्य होईल तेथवर असा निवाडा देण्यात लागू होतील. विवक्षित बाबतीत भूमिसंपादन अधिनियमाचे उपबंध निवड्याच्या नमुन्यास लागू असणे व आवश्यक असलेली पूर्वसंमती घेणे.

(२) ह्या अधिनियमान्वये निवाडा देणारा अधिकारी हा जिल्हाधिकारी असेल, परंतु जमीन महसूल अधिनियमान्वये नेमलेला जिल्हाधिकारी नसेल, आणि अशा निवाड्याची रक्कम पाच हजार रुपयांहून अधिक असेल त्या बाबतीत, जमीन महसूल अधिनियमान्वये नेमण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्याची पूर्वसंमती मिळविल्याखेरीज असा निवाडा देता कामा नये.

१९५८ चा मुंबई ३१. **१९.** मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ यात काहीही असले तरी ह्या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्याविरुद्ध त्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्या विरुध्द अपील.

**२०.** (१) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने, अपील करणारास व राज्य सरकारास नोटीस दिल्यानंतर अपिलावर निर्णय दिला पाहिजे व आपला निर्णय नमूद केला पाहिजे. महसूल न्यायाधिकरणापुढील कार्यपद्धती.

१९०८ चा ५. (२) अपिलाचा निर्णय करताना महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने, व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये मूळ न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर करण्यात आलेल्या अपिलाचा निर्णय करताना न्यायालयास जे अधिकार असतात ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालय जी कार्यपद्धती अनुसरते तीच कार्यपद्धती अनुसरली पाहिजे.

मुदत. **२१.** या अधिनियमान्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे केलेले प्रत्येक अपील, जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे. मुदतीबाबत अधिनियम, १९६३ याची कलमे ४ व १२ चे उपबंध असे अपील दाखल करण्यास लागू असतील. १९६३ चा ३६.

न्यायालय शुल्क. **२२.** *मुंबई न्यायालय-शुल्क अधिनियम, १९५९ यात काहीही असले तरी, या अधिनियमान्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यात येईल अशा किंमतीच्या न्यायालय-शुल्क मुद्रांक लावला पाहिजे. १९५९ चा मुंबई ३६.

निवाडा व महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असणे. **२३.** महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या अपिलास अधीन राहून, ह्या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निवाडा आणि कलम १९ अन्वये केलेल्या अपिलावर महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय अंतिम व निर्णायक असेल व त्यास कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत हरकत घेता येणार नाही.

चौकशी व कामकाज हे न्यायालयीन कामकाज असणे. **२४.** या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे यांजपुढील चौकशीची सर्व कामे व कामकाज ही भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायालयीन कामे आहेत असे समजले पाहिजे. १८६० चा ४५.

भरपाई रोख देणे. [१][**२५.** या अधिनियमान्वये देय असलेली भरपाईची रक्कम पुढील अनुवर्ती कलमाच्या उपबंधांच्या अधीन रोख देण्यात येईल.]

जमीन महसूल वगैरेच्या थकबाकीची रक्कम नुकसान भरपाईच्या रकमेतून वजा करणे. **२६.** ह्या अधिनियमान्वये कोणत्याही इसमास नुकसानभरपाईची कोणतीही रक्कम देण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याने त्या रकमेतून पुढील रकमा वजा करणे हे विधिसंमत असेल :—

(अ) केलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी कोणत्याही दुमाला जमिनीच्या संबंधात जमीन महसूल, उपकर किंवा इतर देणी यांच्या थकबाकीच्या ज्या कोणत्याही रकमा अशा इसमाकडून येणे झालेल्या आहेत असे जिल्हाधिकारी प्रमाणित करील त्या सर्व रकमा, आणि

(ब) राज्य सरकारने दिलेल्या कर्जाची जी कोणतीही रक्कम किंवा तिचा भाग नेमलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी अशा इसमाकडून येणे झालेला आहे असे जिल्हाधिकारी प्रमाणित करील ती संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग व त्यावर काही व्याज असेल तर त्या व्याजाची रक्कम :

परंतु, अशा रीतीने वजा केलेली एकूण रक्कम ही, देण्यात आलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेच्या एक तृतीयांशापेक्षा अधिक होता कामा नये.

## प्रकरण ४

## संकीर्ण

दुमाला जमिनीच्या पट्ट्यांना सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ लागू असणे. **२७.** जर कोणतीही दुमाला जमीन वैधरित्या पट्ट्याने दिली असेल आणि नेमलेल्या दिवशी असा पट्टा अस्तित्वात असेल तर, **मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (ज्याचा यापुढे या कलमात "उक्त अधिनियम" असा उल्लेख केला आहे) याचे उपबंध उक्त पट्ट्याला लागू असतील आणि या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, अशी जमीन धारण करणाऱ्या इसमाचे आणि त्याच्या कुळाचे किंवा कुळांचे हक्क व जबाबदाऱ्या यास, उक्त अधिनियमाचे उपबंध लागू होतील : १९४८ चा मुंबई ६७.

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३ याच्या कलम २ द्वारे मूळ कलम २५ ऐवजी कलम २५ दाखल करण्यात आले.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याची अनुसूची, नोंद ७७ द्वारे दि. १ मे १९६० पासून या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र न्यायालय - शुल्क अधिनियम" अशी सुधारणा केली.

** सन २०१२ चे महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याची अनुसूची, नोंद ३३ द्वारे दि. १-५-१९६० पासून या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम" अशी सुधारणा केली.

परंतु कुळाने सक्तीने जमीन खरेदी करण्याच्या संबंधात उक्त अधिनियमाचे उपबंध लागू करण्याच्या प्रयोजनासाठी, असा पट्टा यथास्थिति कलम ७ किंवा ९ अन्वये ती जमीन परत दिल्याच्या तारखेपासून सुरू झाला आहे असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.– ह्या कलमाच्या प्रयोजनासाठी "जमीन" या शब्द प्रयोगाचा अर्थ, उक्त अधिनियमात त्या शब्दप्रयोगाला जो अर्थ दिला असेल तोच असेल.

**२८.** कोणत्याही वतनाच्या वारसाहक्कासंबंधाने विधीचा कोणताही उपबंध, वहिवाट किंवा प्रघात असेल व त्यामुळे संबंधित पक्षकारांस लागू असलेला वैयक्तिक विधिविरुद्ध अग्रजाधिकारासंबंधी नियम पाळण्यात येत असेल आणि पुरुष वारसास पसंती देऊन स्त्री वारसास मागे टाकण्यात येत असेल, अशा कोणताही उपबंध, वहिवाट किंवा प्रघात हा नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून निरर्थक होईल आणि तो अंमलात असण्याचे बंद होईल. वारसाहक्का-संबंधीचा विशेष नियम निरर्थक होणे.

**२९.** राज्य सरकारच्या **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार त्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार, ते जे निर्बंध व ज्या शर्ती लादील त्या निर्बंधास व शर्तीस अधीन राहून, जिल्हा अधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या आपल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवून देता येतील. अधिकार सोपवणे.

**३०.** (१) राज्य सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन राहून, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करता येतील. नियम.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींची तरतूद करता येईल.—

(अ) कलम ७ अन्वये, ज्या मुदतीत व ज्या रीतीने भोगाधिकार मूल्य देण्यात येईल ती मुदत व ती रीत ;

(ब) कलम १६ व १७ अन्वये, ज्या मुदतीत व ज्या नमुन्यात नुकसानभरपाईसाठी अर्ज करण्यात येईल ती मुदत व तो नमुना ;

(क) कलम २२ अन्वये, अपिलावरील न्यायालय-शुल्क-मुद्रांकाची किंमत ;

[१][* * * * * * *]

(इ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी कोणतीही इतर गोष्ट.

(३) ह्या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल. इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३ याच्या कलम ३ द्वारे खंड (ड) वगळण्यात आला.

होतील किंवा तो नियम करण्यास येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो नियम **राजपत्रात** अशा निर्णयाची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

**३१.** या अधिनियमातील कोणत्याही उपबंधामुळे— बचाव.

(१) नेमलेल्या दिवसापूर्वी दुमाला वहिवाटीच्या संबंधात आनुषांगिक गोष्ट म्हणून आधीच पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी, किंवा

(२) अशा बंधनाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधातील कोणतेही कामकाज किंवा उपाययोजना, यांस बाध येणार नाही, आणि हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून असे कोणतेही कामकाज चालू ठेवता येईल किंवा अशी कोणतीही उपाययोजना अंमलात आणता येईल.

**अनुसूची**

कलम २ (१) (अ) पहा.

**अहमदनगर जिल्हा**

| | |
|---|---|
| १. आघी, | ९. हसनाबाद, |
| २. भिलवडे, | १०. जावळे, |
| ३. चोंडी, | ११. जवळके, |
| ४. धनेगाव, | १२. कौडगाव, |
| ५. धानोरा, | १३. खामगाव, |
| ६. फकराबाद, | १४. नान्नज, |
| ७. गिरवली, | १५. पिंपळखेड, |
| ८. हालगाव, | १६. वाघा. |

**सोलापूर जिल्हा**

| | |
|---|---|
| १. आंदेवाडी जहागीर, | ९. बोपळे, |
| २. अंजनगाव, | १०. बोरगाव, (तालुका बार्शी), |
| ३. अष्टे, | ११. बोरगाव, (तालुका करमाळा), |
| ४. बालेवाडी, | १२. बुद्रुकवाडी, |
| ५. भागाईचीवाडी, | १३. चव्हाणवाडी, |
| ६. भैरववाडी, | १४. चिक्केहळ्ळी, |
| ७. भोइंजे, | १५. दारफळ बिबी, |
| ८. भोईर, | १६. देगाव, |

**सोलापूर जिल्हा**--*चालू*

१७. धानोरे,
१८. डिकसळ,
१९. दिलमेश्वर,
२०. एकुरके,
२१. घोरपडी,
२२. हाटकरवाडी,
२३. इंचगाव,
२४. इरले,
२५. जामगाव,
२६. कालमान,
२७. कापसेवाडी,
२८. करम्ब,
२९. केवड,
३०. खैराव,
३१. खुनेश्वर,
३२. कवठाळी,
३३. मानगाव,
३४. मंगोली,
३५. मसले-चौधरी,
३६. मुंगेशी-वळूज,
३७. नानज,
३८. पाचपुलवाडी,
३९. पडसाळी,
४०. पवारवाडी,
४१. पोफळी,
४२. पोटेगाव,
४३. रानमसले,
४४. राऊळगाव,
४५. रिघोरे,
४६. सासुरे,
४७. शेळगाव होल्र्याचे,
४८. शेंद्री,
४९. शिवणी,
५०. श्रीपत-पिंपरी,
५१. सुलतानपूर,
५२. तरटगाव,
५३. उपळाई,
५४. बळूज,
५५. वानगी,
५६. वारलेगाव,
५७. विडे खुर्द,
५८. येलमावडी.

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

* **संचालक,**
शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी : ०२२/२३६३२६९३ व २३६३०६९५,
२३६३११४८, २३६३४०४९.

* **व्यवस्थापक,**
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी : ०२०/२६१२५८०८, २६१२४७५९.

* **व्यवस्थापक,**
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
सिव्हिल लाईन्स,
नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : ०७१२/२५६२६१५.

* **सहायक संचालक,**
शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौकाजवळ,
औरंगाबाद-४३१ ००१.
दूरध्वनी : ०२४०/२३३१४६८, २३३१५२५.

* **व्यवस्थापक,**
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क,
कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : ०२३१/२६५०३९५, २६५०४०२.

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते.**